संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

आणि

श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित

# तक्षशिला महाविद्यालय, अमरावती समाजशास्त्र विभाग

आणि

# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन

दि. २३ व २४ जानेवारी २०२०

-: विषय :-

**भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती**

स्थळ

"राजवाडा"

देशमुख लॉन समोर, शेगाव नाका रोड, अमरावती

आयोजक

समाजशास्त्र विभाग

तक्षशिला महाविद्यालय, अमरावती

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# Takshashila Mahavidyalaya, Amravati
## Department of Sociology & Marathi Samaj Shashtra Parishad
### Organised
### TWO DAY NATIONAL CONFERENCE
### ON
### *HUNDRED* YEARS OF SOCIOLOGY IN INDIA

**ISBN : 978-81-941195-4-8**

**Publication :** Shabdkanti Prakashan, Amravati.

**Owner :** Secretary, Shri. Dadasaheb Gawai Charitable Trust, Amravati

**Published By :** Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravtai.

**Printed By :** Atharv Graphics, Amravati

**Patron**

Dr. Kamlatai R. Gawai, Founder President, SDGCT, Amravati.
Mrs. Kirtitai Rajesh Arjun, President, SDGCT, Amravati.

**Adviory Board**

Prof. P. R. S. Rao, Secretary, SDGCT, Amravati.
Dr. Padwal Mallu, Principal, Takshashila Mahavidyalaya, Amravati
Dr. Saroj Aglawe, President Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Dipak Pawar, Secretary, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. Rahul Bhagat, Treasurer, Marathi Samajshashtra Parishad.
Dr. K. M. Akotkar.
Dr. P. R. Abhyankar.
Dr. Daya Pande.
Prof. Nandkishor Raut.
Dr. Sanjay Bhagat.
Dr. Pradip Ambore.
Prof. Sandip Hadole.

**Editor :** Dr. Anjali R. Wath.

**Board of Editor :** Prof. Pritesh Patil.
Prof. Pravin Wankhade
Prof. Sachin Pandit.

**Cover Page Design :** Gajanan Dhole

**Type Setting :** Atharv Graphics Amravati,

**Date of Publication :** Thurday, 23rd January, 2020

**Note :** 1) The Souvenir is for private distribution only. 2) The Editor and the Board of Editors may or may not agree with the thoughts of the writers in case of authenticity of their paper.

[All the rights are reserved by Publication.]

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

| | | | |
|---|---|---|---|
| | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | | |
| 73 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान (समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान) | प्रा. डॉ. जयमाला लाडे | 325 |
| 74 | महाराष्ट्रातील समाजशास्त्रज्ञांसमोरील संशोधनविषयक आव्हाने : सर्वेक्षण एक अभ्यास | डॉ. सुमेंद्र ठाकुर | 332 |
| 75 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार आणि समाजशास्त्रीय योगदान | प्रा. डॉ. पद्मानंद म. तायडे | 339 |
| 76 | महाराष्ट्रातील समाजशास्त्रीय संशोधनाचे स्वरूप : शोधगंगा संकेतस्थळावरील शोधप्रबंधांचे आशय विश्लेषण | राकेश भगवान पाटील, | 342 |
| 77 | भारतातील समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ.बी.एच.किर्दक | 351 |
| 78 | भारतीय समाजशास्त्र: सद्यस्थीती आणि आव्हाने | बंडु पाटेकर, | 354 |
| 79 | सद्यस्थितीत समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हाने | डॉ. दहिकांबळे एस.डी., | 358 |
| 80 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | प्रा. लिना वि. गादेवार | 361 |
| 81 | सदयस्थितीत समाजशास्त्रासमोरील आव्हाने | प्रा. डॉ. आनंदा भिकुजी काळे | 369 |
| 82 | भारतीय समाजशास्त्रांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. दामोदर चंद्रभान दुधे | 372 |
| 83 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाज व्यवस्थेबद्दलच्या विचारांचे योगदान | प्रा. डॉ. एस. जे. इंगळे | 378 |
| 84 | भारतीय समाजाच्या परिवर्तनात बुद्ध धम्माची भूमिका | प्रा. डॉ. कालिदास मारूती भांगे | 383 |
| 85 | विस्थापन व पुनर्वसन यामधील सहसंबंध | डॉ. वर्षा रामकृष्ण बोपचे (मोसे), | 387 |
| 86 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | श्रीनिवास गो. हिंगमिरे | 390 |
| 87 | भारतीय समाजषास्त्रज्ञांचे समाजषास्त्रात योगदान:डॉ. इरावती कर्वे | सृहा. प्रा. डॉ. संतोष मेंढेकर | 396 |
| 88 | 'मराठी समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान' | डॉ. माधवी रेणावीकर, | 401 |
| 89 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार एक समाजशास्त्रीय विश्लेषण. | प्रा.डॉ. मधुकर धुतुरे | 405 |
| 90 | भारतीय समाज आणि पाश्चात्य समाजाच्या संशोधनाची चौकट : एक तुलनात्मक अभ्यास | डॉ. श्वेतांबरी प्र. कनकदंडे | 409 |
| 91 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ.नारायण तु. कांबळे | 415 |
| 92 | DEVELOPMENT OF SOCIOLOGY IN INDIA | Prof. Shilpa Jadhav | 425 |
| 93 | भारतीय समाजशास्त्रज्ञांच्या अभ्यासातील समाजविषयक दृष्टिकोन | डॉ. पुरुषोत्तम मनगटे | 429 |
| 94 | भारतीय समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रात योगदान | डॉ. नंदकुमार कुकलारे | 433 |
| 95 | पाणी फाऊंडेशनच्या वॉटरकप चळवळीचा ग्राम विकासातील भूमिकेचा समाजशास्त्रीय अभ्यास: बीड तालुक्याच्या संदर्भात | डॉ. सुधीर आ. येवले | 438 |
| 96 | मराठी समाजशास्त्रज्ञांचे समाजशास्त्रातील योगदान | डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर | 443 |


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

# महाराष्ट्रातील समाजशास्त्रज्ञांसमोरील संशोधनविषयक आव्हाने : सर्वेक्षण एक अभ्यास

डॉ. सुरेंद्र ठाकुर
सहायक प्राध्यापक (समाजशास्त्र), शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद. – ४३१००१
Email.: surrendrathakur@gmail.com, Mob:9860558919

## प्रस्तावना:

समाजशास्त्रांसमोरील संशोधनविषयक आव्हाने हे मुख्यत्वेकरून संशोधन, संशोधक, उच्चशिक्षणाची ध्येयधोरणे निश्चित करणारी शासन व्यवस्था, प्रशासन व काही तांत्रिक घटक यांच्याशी संबंधीत असल्याचे म्हणता येतील. ढोबळमानाने सांगावयाचे झाल्यास, संशोधन हे उच्च प्रतिचे, दर्जेदार व शास्त्रीय असणे हे संशोधक व संशोधकांकडून होणाऱ्या संशोधनावर अवलंबून असते. परंतु प्रत्यक्षात असे संशोधन करीत असतांना अनेकदा संशोधकांची जिज्ञासा, तपश्चर्या, कष्ट उपसण्याची मनाची तयारी, शोधवृत्ती आणि सामाजिक बांधिलकी काहीशी अपुरी पडतांना दिसती आहे. तर बऱ्याचदा योग्य मार्गदर्शनाचा अभाव, अपुरे ज्ञान, शास्त्रशुध्द् ज्ञानाची उणीव व संशोधक विद्यार्थ्यांतील इच्छाशक्तीचा अभाव वगैरे बाबी पहावयास मिळतात.

अनेकदा उच्चप्रतिचे संशोधन निर्माण करण्यासाठी अत्यावश्यक असणाऱ्या दर्जेदार, शास्त्रशुध्द्, नावलौकीक व प्रमाणीत संदर्भग्रंथाची अचुक निवड करण्यासबंधीचे आव्हान जिज्ञासू संशोधकासमोर आहे. त्याशिवाय संशोधकाचा विषय निवडीसंबंधीचे स्वातंत्र्य नसणे, प्रश्नावलीच्या आदर्श प्रारूपासंबधीचे अपुरे ज्ञान, नमुना निवडतंत्रासंबंधीचे निकष, तथ्यांच्या विश्लेषण व स्पष्टीकरणातील सहजासहजी लक्षात न येणारी धुसर अस्पष्टता ही सुध्द् संशोधकासमोरील आव्हाने आहेत.

इतकेच नव्हे तर, गुणात्मक व संख्यात्मक संशोधनातील तथ्य संकलन तंत्र पध्द्ती नेमकी कोणती आहे? ती कशी हाताळायची असते? गृहितकृत्याबद्दल व संशोधनप्रश्नासंबंधी समसमान समज असणे, गृहितकृत्याची चाचणी घेणे अत्यावश्यक असते याबद्दलची अनभिज्ञता व अज्ञान, गृहितकृत्याच्या चाचणी घेण्यासाठी सांख्यिकीय चाचणी व त्यांचे सैध्दांतिक ज्ञान असणे किती अत्यावश्यक असते याबाबत आजपर्यंतही समाजशास्त्रज्ञांमध्ये पुरेशी जनजागृती व उद्बोधन झाल्याचे पहावयास मिळत नाही. महत्वाचे म्हणजे एसपीएसएस, आर, मिनीटॅब व ॲटलास–टी सारख्या संख्यात्मक व गुणात्मक संशोधन सॉफ्टवेअरसंबंधी आजचे संशोधन अजूनही अजाण् असून, कुशल संशोधक म्हणून त्यांचे प्रयत्न कमी पडतांना आढळते आहे.

अशाप्रकारे संशोधनाच्या माध्यमातून निर्माण करावयाची सृजनशीलता ही सपूर्ण जबाबदारी आजच्या संशोधक व त्यांच्याकडून पार पाडल्या जाणाऱ्या सर्वसमावेशक, नाविण्यपूर्ण पण शास्त्रशुध्द् संशोधनावर आधारीत आहे. ह्या संशोधन निबंधाचा मूळ उद्देश हा सद्यकालीन महाराष्ट्रातील समाजशास्त्रज्ञांसमोरील संशोधनाविषयक आव्हानांचे स्वरूप स्पष्ट करून त्याची चर्चा करणे हे होय. ह्या उद्देशपूर्तीसाठी संशोधकाने सद्गुणाधिष्ठीत दृ ष्टिकोनाचा (The Virtue Approach) आधार घेतला आहे.

## संशोधन विषयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:

सदरील संशोधनासाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातील समाजशास्त्र विषयातील संशोधक विद्यार्थ्यांची उत्तरदाते म्हणुन निवड करण्यात आली आहे. यापैकी काही विद्यार्थी एम.फिल. व पीएच.डीचे संशोधन कार्य करीत असून त्यापैकी काही पदवी प्रदान होण्याच्या प्रतिक्षेत आहेत, तर काहींना पदवी प्रदान झालेली आहे.

ह्या संशोधनाचा मुळ उद्देश हा महाराष्ट्रातील समाजशास्त्रातील संशोधकांच्या संशोधनाविषयीचा कल, आवड, विचार, दृष्टीकोण लक्षात घेवून संशोधनाच्या प्रक्रियेतील त्यांना आलेल्या अडीअडचणीचे वा आव्हानाचे स्वरूप समजावून घेणे हा होय. संबंधीत उद्देशपुर्तीसाठी संशोधन प्रक्रियेतील प्रत्येक टप्यावर संशोधक विद्यार्थ्यांना आलेल्या लहानसहान अडचणीसह, संपूर्ण संशोधनाचा मागोवा घेण्यात आला. हा मागोवा घेत असतांना संशोधन कार्यातील वाङ्मयीन साहित्याचा आधार कसा घेण्यात आला, संशोधन पध्दतीशास्त्राचा वापर कशारीतीने करण्यात आला, सैध्दांतिक चौकट, समस्यासूत्रण, संदर्भग्रंथसूची वापरावयाची शैली व नवीन संशोधनासाठी तुमच्या

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संशोधनाचे योगदान काय असेल? यासारख्या निकषांच्या आधारे संशोधनाविषयीचे संशोधकाचे ज्ञान व त्याची जिज्ञासूवृत्ती समजून घेण्याचा प्रयत्न करून उद्दिष्ट्येनिहाय मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. संशोधन पूर्ण झालेल्या संशोधनाच्या माध्यमातून संशोधन विषयाची स्पष्टता व वस्तुनिष्ठता कशी आहे? पुरेशा संशोधनपध्दती व तंत्राचा वापर झाला आहे का? प्रबंधाच्या भाषेची स्पष्टता व उद्दिष्टांची अचुकता किती आहे? इत्यादीसारख्या निकषांच्या आधारे संशोधकाच्या संशोधनाचे आकलन करून संशोधनाची वस्तुनिष्ठता समजावून घेण्याचा प्रयत्न झाला.

थोडक्यात सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ कायदा आणि कालानुक्रमे घालून दिलेल्या नियम व ध्येय धोरणानूसार, दर्जेदार संशोधन करून सृजनशीलता वाढावी व उत्कृष्ट दर्जेदार संशोधक अधिकाधिक निर्माण व्हावेत हा व्यापक दृष्टीकोन बाळगून आहे. निर्माण झालेल्या दर्जेदार संशोधनातून समाजव्यवस्थेतील समस्यांची उकल व्हावी व संपूर्ण समाजजीवन समृध्द व्हावे ही आशा बाळगण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात संशोधनातील वस्तुस्थिती कशी आहे, हे समजून घेण्याचा एक अल्पसा प्रामाणिक प्रयत्न येथे संशोधक करीत आहे.

उद्दिष्टे आणि संशोधन पध्दतीशास्त्र :

**I.** उद्दिष्टे :

१. महाराष्ट्रातील सघकालीन समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हानाचे स्वरुप समजुन घेणे.

२. महाराष्ट्रातील सघकालीन समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हानांची साधकबाधक चर्चा करणे.

**II.** सैध्दांतिक दृष्टिकोन :

सदरील संशोधनासाठी सदगुणाधिष्ठित दृष्टीकोनाचा आधार घेण्यात आला आहे. विद्यापीठ अनुदान आयोगानी व विद्यापीठ कायद्यान्वये काळानुरुप घालुन दिलेल्या निती व नियमांनुसार उत्कृष्ट संशोधन व आदर्श संशोधकांची संख्या अधिकाधिक वाढत जावी. शिवाय सदरील संशोधनाच्याा आधारे समाजव्यवस्थेतील अनेक लहानसहान समस्येवर कायमस्वरुपी व परिणामकारक उपाय शोधून नागरिकांच्या सामाजिक आरोग्याचा दर्जा वाढविण्यात यश प्राप्त व्हावे हा उदात्त हेतु बाळगुन हया दृष्टिकोनाचा आधार घेण्यात आला आहे.

संशोधन नमुना **(paradigms research)**

सदरील संशोधनासाठी मिश्र पध्दतीचा अर्थात गुणात्मक व संख्यात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आला आहे. एफजीडी–फोक्स्ड् ग्रुप डिस्कशन हया गुणात्मक तथ्य संकलन तंत्रपध्दती व प्रश्नावली हया संख्यात्मक तथ्य संकलन तंत्राचा आधार घेवून तथ्यसंकलन करण्यात आले आहे.

नमुना आराखडा : **(Sample design)**

सदरील संशोधनासाठी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठात संशोधन करणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांचा नमूना एकक म्हणून विचार करण्यात आला आहे.

तथ्य संकलनाचे स्त्रोत : प्राथमिक व व्दितीयक दोन्ही स्त्रोताचा तथ्यसंकलनासाठी आधार घेण्यात आला. प्राथमिक स्त्रोत म्हणुन महाराष्ट्रातील विद्यापीठात संशोधन करणाारे संशोधक विघार्थी हे आहेत. तर व्दितीयक स्त्रोत म्हणुन वर्तमानपत्रातील बातम्या, युजीसीचे नियम व निकष, संशोाधन जर्नल्स व लेख इत्यादी.

नमुना आकार :

महाराष्टातील १० विद्यापीठाान समाजशास्त्र विषयात संशोधन करणाऱ्या एकून ५० संशोधक विद्यार्थ्यांची नमुना म्हणुन निवड करण्यात आली. यामध्ये मुख्यत्वेकरून गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, नागपुर विद्यापीठ नागपूर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, मुंबई विद्यापीठ, मुंबई, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापीठ, कोल्हापुर, अशा एकूण १० विद्यापीठातून प्रत्येकी ०५ उत्तरदान्याची नमुना म्हणुन निवड करण्यात आली.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

नमुनानिवड तंत्र :

असंभाव्यता नमुनानिवड तंत्रपध्द्ती अंतर्गत उद्देशनिहाय नमूना पध्द्तीचा वापर करुन नमुन्याची निवड करण्यात आली आहे.

नमुना एकक :

विद्यापीठातील समाजशास्त्र विषयात एम.फिल किंवा पी.एच.डी. करणारा संशोधक विद्यार्थी हा या संशोधनासाठी नमुना एकक म्हणुन निवडला आहे.

तथ्यसंकलन पध्दती :

फोकस्ड् ग्रुप डिस्कशन व प्रश्नावलीच्या आधारे तथ्य संकलन करण्यात आले आहे.

साधन आराखडा **(Tool Design)** :

साधन आराखडयाच्या तयारीसाठी चल, कार्याभिमूख आराखडा व संशोधनातील मापनाचे स्तर याचा आधार घेण्यात आला.

सांख्यिकीय विश्लेषण आराखडा :

सांख्यिकीय विश्लेषण आराखडयाच्या आधारे संशोधकाला हे निश्चत करावे लागते की, पाईचार्ट, बारचार्ट, हिस्टोग्राम कुठे वापरायचा आहे? कोणत्या ठिकाणी झेड टेस्ट, टी–टेस्ट किंवा एफ–टेस्ट वगैरे सारखे परीक्षण करावयाचे आहे. सांख्यिकीय विश्लेषणासाठी एसपीएसएस , मिनीटॅब किंवा आर वगैरेपैकी कोणते सॉफ्टवेअर वापरायचे आणि का? यासंबंधी निर्णय घ्यावे लागतात.

<u>तथ्य विश्लेषण व चर्चा:</u>

संबंधीत संशोधन पेपरमधील उदिष्टयेप्राप्तीसाठी संशोधकाचे ज्या चलांचा आधार घेवुन विश्लेषण (Analysis) व स्पष्टीकरण (Interpretation) केले ते पुढीलप्रमाणे सांगता येईल. शिर्षकासंबंधी उत्तरदात्याचे मतमतांतरे काय आहेत? सघकालीन समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हानाचे स्वरुप, संशोधनविषयक इंग्रजी माध्यमांची पुस्तके वाचण्याकडील कल, प्रत्यक्षात इंग्रजी वाचल्याची परीस्थिती जाणुन घेण्यासंबंधी संशोधन क्षेत्रातील उपलब्ध असणाऱ्या एकूण उत्तरदात्यांपैकी प्रतिनिधीक स्वरुपात किती एकक नमुना निवड करावयाची आहे हे चलांच्या स्वरुपात मांडून संशोधनाचे विश्लेषण व चर्चा करण्याचा प्रयत्न झाला आहे. याशिवाय गृहितकाविषयीचे व सांख्यिकिय चाचण्याचे ज्ञान, गुणात्मक संशोधनाविषयीची महाराष्ट्रातील स्थिती, दर्जा व संशोधनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन यासारख्यां चलाच्यां माध्यमातुन संशोधनाचा दर्जा व संशोधकाची बांधीलकी, सचोटी व प्रामाणिकता जाणुन घेण्यास मदत झाली.

तर संशोधन करण्यामागचा संशोधकाचा दृष्टिकोन, स्केल ऑफ मिझरमेन्टसंबंधीच्या ज्ञानाची पातळी, प्रश्नावली संबंधीच्या प्राथमिक ज्ञानाची चाचणी आणि प्रश्नावलीचे आदर्श प्रारुप कसे असायला हवे? यासारख्या चलांच्या व संशोधन प्रश्नांच्या माध्यमातून संशोधनाचा दर्जा व त्यांची समाजासाठीची उपयुक्तता यासंबंधीचे जागरण होण्यास सहकार्य झाले. अर्थातच वरील सर्व चल व संशोधन प्रश्नांच्या माध्यमातुन संशोधकाने सदरील संशोधनातील उद्दिष्ट्ये स्पष्ट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

सद्यकालीन संशोधनासाठी बहुसंख्य संशोधकांनी युजीसी, इम्प्रेस, स्ट्राईड, बार्टी, महिला आयोग, रुसा, आयसीएसएसआर व मानवी अधिकार संस्थांकडून रूपये पन्नास हजार ते पाच करौड रुपयापर्यंतचे अनुदान प्राप्त होण्याची सहजसुलभ सुविधा उपलब्ध करून दिली आहे. परंतु अनेक संशोधक लेखापालाच्या तांत्रिक अडीअडचणीमुळे संशोधन करण्यासाठी अनुदान घेण्याचे धाडस करीत नाही किंवा लघु संशोधन प्रकल्प पुर्ण करण्यावरच भर देतात. अनेक संशोधक स्वत:कडील विघार्थ्यांना संशोधन प्रकल्पाच्या कामी लावून, दुय्यम संशोधन करून अनुदान मिळविण्याचा प्रयत्न करताना आढळतात. तर अनेकजण या प्रयत्नात आहेत की, संशोधन प्रकल्पाचा विषय स्वत:कडील संशोधक विघार्थ्यांना देवुन त्या माध्यमातुन प्रकल्पाचे काम पुर्णत्वास न्यावे. अनेकजण एकमेकांच्या तडजोडीने व सहकार्याने जुजबी कामचलावू व तात्पुरत्या स्वरुपात जमेल तसा प्रकल्प पुर्ण करण्यावर भर देण्याचा दृष्टिकोन बाळगून संशोधन कार्यात स्वत:चे सहभागित्व सिध्द करतांना आढळतात.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN No. : 978-81-941195-4-8 

अधिकांश संशोधक प्रश्नावलींच्या माध्यमातुन तथ्य संकलन करीत असतात. प्रत्यक्षात तथ्यसंकलनाच्या दर्जावरच संशोधनाची गुणवत्ता निश्चित होत असते. परंतु प्रश्नावलीमध्ये इंटरवल लेवल व रेशो लेवल (Interval and Ratio level) यांच्या माध्यमातुन विचारलेल्या प्रश्नांना अधिक सक्षम व अधिक सबल मानले जाते. कारण ह्या प्रश्नांच्या माध्यमातुन संकलीत केलेल्या तथ्यांवर अतिप्रगत सांख्यिकीय चाचणी केली जाते व विश्लेषण खुपच दर्जेदार व उत्कृष्ट बनविणे सहजसुलभ जाते. पण महाराष्ट्रातील संशोधकांच्या प्रश्नावलीतील बहुसंख्य प्रश्न हे ओरडिनल व नॉमिनल (Ordinal and Nominal level) या स्केलवर विचारलेले पाहावयास मिळतात. ज्या प्रश्नांमधुन खुपच हलक्या प्रतिचे तथ्य संकलीत होत असतात. परंतु अनेक संशोधकाना ही बाब खात्रीपुर्वक व सर्वार्थाने माहीत नसल्याचे चर्चेअंती लक्षात आले. तर अनेक सांख्यिकीय चाचण्याशी काही घेणे देणे नाही अशाप्रकारचा पिंड सामाजिक शास्त्रातील विशेषत: समाजशास्त्रातील संशोधकांमध्ये पहावयास मिळाला.

सध्या संशोधनासाठी डिजिटल ग्रंथालय यासाठी अद्यावत तंत्रज्ञान म्हणुन वल्डोमिटर्सची (Worldometer) ची जगभर ख्याती वाढत आहे. स्कोपस सोशल सायन्स सुध्द् वल्डोमिटर्सप्रमाणे संशोधनासाठी अद्यावत आणि सांख्यिकिय साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी अग्रेसर असणारी शैक्षणिक व संशोधक व्यवस्था आहेत. तर इम्पॅक्ट फॅक्टर जर्नलची सर्वत्रच वाढती रेलचेल असली तरी आंतरराष्ट्रीय स्तरावर मात्र केवळ आणि केवळ थॉमसन रुटर्स (Thomson Reuters) इम्पॅक्ट फॅक्टरलाच प्रमाणित म्हणुन मान्यता प्राप्त झालेली आहे. ह्या सर्व बाबी संशोधकासाठी माहीत असणे अत्यावश्यक व गरजेचे असले तरी बोटावर मोजण्याइतकेच संशोधक ह्या बाबी जाणतात ही वस्तुस्थिती आहे.

सैध्दांतिक दृष्टिक्षेपसंबंधी संशोधक–मार्गदर्शक, संशोधक व अभ्यासविषयाचे विघार्थी या सर्वामध्येच वेगवेगळ्या चुकीच्या समजुती व गैरसमज असल्याचे चर्चाअंती व प्रबंधाद्वारे पहावयास मिळाले. सर्वात महत्वाची व प्राथमिक बाब म्हणजे आपण सर्वचजण आपले संशोधन सक्तीने पाश्चात्य सिध्दांताच्या चौकटीत बसविण्याचा प्रयत्न करीत आलो आहे. याचे मुळ कारण म्हणजे संशोधक स्वत: प्रामाणिकपणे अभ्यास क्षेत्रात तथ्यसंकलनासाठी जात नसावा किंवा पुरेशी सैध्दांतिक चौकटाची संकल्पना मांडण्यासाठी नमुना निवड एकक उत्तरदात्याची संख्या कमी निवडली जाण्याची शक्यता असावी किंवा सिध्दांत मांडण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण, ज्ञान, मार्गदर्शन व सराव यांची कमतरता पडत असावी. सर्वात महत्वाची बाब अशी की, भारतीय समाजव्यवस्थेतील संरचनाच्या अनुषंगाने सिध्दांत मांडतांना पाश्चात्य सिंद्धातांचे अनुकरण करणे म्हणजे गंजलेल्या तलवारीने युध्द् लढण्यासारखे होय.

संशोधकासमोरील आव्हान म्हणून संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर पदवी प्रदान होण्यासाठीचा विलंब याचा ही उल्लेख अनेक संशोधकांनी केल्याचे आढळते. पदवी प्रदान होण्यासंबंधीचा विलंब हे आव्हान असलेतरी त्यापेक्षा गंभीर व चिंतेची बाब म्हणजे काही संशोधकाना संशोधन प्रबंध झाल्यानंतर पंधरा दिवसात पदवी प्राप्त होते, तर अनेकांना तीन–तीन वर्षापर्यंत वाट पहावी लागते. वास्तविकत: ही बाब संशोधकाच्या मानवी अधिकारांचे शोषण करणारे गंभीर आहे.

महाराष्ट्रातील सद्यकालीन समाजशास्त्रज्ञांसमोरील आव्हानाचा विचार करीत असतांना सर्वप्रथम आपण संशोधन विषयाच्या शिर्षकावर प्रकाश टाकलेला आहे. अधिकाश विद्यापीठातील संशोधकानी वापरलेले शिर्षक हे इतर विद्यापीठाच्या तुलनेनी अपूर्ण, अशास्त्रीय असंदिग्ध व अस्पष्ट असल्याचे पहावयास मिळतात,. या संदर्भात डॉ. डी. एन. सनसनवाल शिक्षणतज्ज्ञ, ऑस्ट्रेलिया यांच्या मते, संशोधनातील शिर्षकामध्ये मुख्यत्वे करून चल, संशोधनाचा प्रकार, संशोधन अभ्यासक्षेत्र व अभ्यासाचा मुख्य लोकसंख्यात्मक घटक इत्यांदीचा आंतर्भाव असणे आवश्यक आहे. अशा शिर्षकाच्या शेवटी पुर्णविराम, एकेरी अवतरण चिन्ह किंवा दुहेरी अवतरण चिन्ह वापवरण्याची मूभा येथे नसते. प्रत्येक शिर्षक हे विधान असल्याकारणाने येथे पुर्ण विराम वापरता येत नाही. एस. जोबर्ग आणि नेट (१९९२) यांच्या म्हणण्यानुसार, शिर्षक निवडणे किंवा लिहिणे हे आजच्या काळात एक प्रकारची फॅशन, गैरअभिमान किंवा फॅड म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

ISBN No. : 978-81-941195-4-8

समाजशास्त्र विषयाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन करणा:या सद्यकालीन संशोधकांना समाजशास्त्रज्ञ म्हणावे का? असा प्रश्न एकदंरीत संशोधनाचा आवाका पाहिल्यास वाटते. परंतु प्रन्यक्षात योगेंद्रसिह, डि.पी. मुखर्जी, एम.एन.श्रीनिवास, एस.सी.दुबे, जी.एस.घुर्ये, रोमिला थापर, टि.के.वूमेन, डि.एन.धनागरे, ए.आर.देसाई, एन.के.बोस, डॉ.सुराजित सिन्हा व डॉ. यु.एस.भोईटे इत्यादी सारख्या समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी जगभर नावालौकीक प्राप्त केला. प्रत्यक्षात या अभ्यासकांच्या समोर आजच्या तुलनेनी वेगळ्या आणि अधिक आव्हाने व समस्या होत्या. जसे की १९६०–७० च्या दशकात संगणक किंवा एसपीएसएस सारखे सांख्यीकीय सॉफ्टवेअर अजून भारतात यायचे होते. परीणामी संशोधनाचे विश्लेषण मॅन्युअली करण्याशिवाय पर्याय नव्हता. तर संशोधनाचे टाईप ही बाब वेळखाऊ व आधिक कष्टाची होती. संदर्भग्रथांसाठी सुध्दा आजच्या काळाप्रमाणे worldometers वल्डोमीटर्स किंवा स्कोपस सोशल सायन्स उपलब्ध नव्हते. परीणामत: संदर्भग्रंथासाठी वेगवेगळ्या विद्यापीठातील ग्रंथालयाला वैयक्तीक भेटी देवून संदर्भ संकलीत करावे लागत असायचे. पण इतके असूनही या अभ्यासकांच्या संशोधनामध्ये कुठलीही अपुर्णता, त्रुटी किंवा कमतरता राहिल्याचे भासत नाही. याउलट या अभ्यासकांनी समाजशास्त्रातील संशोधनाला एका उंचीवर नेवून संशोधन प्रतिष्ठा प्रदान केली व सद्यकालीन संशोधकाला एक आदर्श घालून दिला.

तक्ता क्र. ०१

संशोधनाविषयक इग्रंजी भाषेतील पुस्तके वाचायला आवडतात का?

| इंग्रजी पुस्तक वाचनाच्या आवडीविषयी | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | ३४ | ६८ टक्के |
| नाही | १६ | ३२ टक्के |
| एकूण | ५० | १०० टक्के |

संशोधन विषयाच्या संबंधीत संदर्भग्रंथ वाचायला आवडतात का? असा प्रश्न केला असता एकूण उत्तरदात्यापैकी ३४ (६८ टक्के) उत्तरदात्यांनी होय म्हणून उत्तर दिले. तर केवळ १६ उत्तरदात्यांनी इग्रंजी पुस्तक वाचायला आवडते पण वाचलेले कळत नाही असे स्पष्टीकरण दिले.

तक्ता क्र. ०२

संशोधनाविषयाची इंग्रजी पुस्तके वाचली का?

| संशोधनाविषयक पुस्तकाचे वाचन केले | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १४ | २८ टक्के |
| नाही | ३६ | ७२ टक्के |
| एकूण | ५० | १०० टक्के |

संशोधनाविषयक इंग्रजी पुस्तक वाचण्याविषयीचा कल लक्षात घेतांना असे लक्षात आले की, अधिकांश म्हणजे ३४ (६८ टक्के) उत्तरदात्यांनी संशोधनासबंधीचे इग्रंजी संदर्भग्रंथ वाचायला आवडतात असे म्हटले असलेतरी प्रन्यक्षात १४ (२८ टक्के) उत्तरदाते हे संशोधनासंबंधीच्या पुस्तकाचे वाचन करण्यासाठी आग्रही दिसले. पण महत्वाची बाब अशी की या उत्तरदात्यापैकी केवळ ०२ उत्तरदाते असे आहेत की, त्यांचा प्रबंध इंग्रजी भाषेत लिहीणार आहेत पण या दोन्हीही उत्तरदात्यांना दर्जेदार व प्रमाणित संदर्भग्रंथाचा परीचय नसल्याचे आढळले.

सांगायचे तात्पर्य हेच की, अधिकांश संशोधन हे मराठी व हिंदी भाषेतील संदर्भग्रंथ वाचून पूर्ण करीत असल्याचे आढळले. परीणामी इंगजी भाषेतील संशोधनासंबंधीच्या दर्जेदार संदर्भग्रथांपासून जसे की, अर्ल बेबी, ब्रिमन , गॅरी ओहल्र्ट, नोएलकार्ड, कॅम्बेल आणि स्टॅनले, सी.ए.मोझर आणि जी. काल्टन. डोनाल्ड रॅटाक्लिफ व डी.के. लालदास यांच्या ग्रंथापासुन मिळणाऱ्या ज्ञानाला अनेक संशोधक वंचित राहून मुकल्याने खऱ्या ज्ञानाला व संशोधनाला सुध्दा मुकल्यासारखे दिसुन येते

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संशोधन अभ्यासक्षेत्रातील एकूण एककांपैकी प्रतिनिधीक नमुनानिवड म्हणुन किती एककाची नमूना निवड करण्यांसबंधी अधिकांश संशोधकांमध्ये संभ्रमावस्था, गोधंळलेली आवस्था किंवा अनुकरणाप्रियता असल्याची आढळते. परंतु यांसबंधीचे सविस्त्र स्पष्टीकरण देणारा एकही संदर्भ उत्तरदात्यांपैकी कोणत्याही संशोधकाला सांगता आलेला नाही. वास्तविकत: इ.स. १९७० मध्ये आर. व्ही. क्रेजसी आणि डी. डब्ल्यू. मोर्गन यांनी संशोधन अभ्यास क्षेत्रातून प्रतिनिधीक स्वरूपात किती एककाची नमूना निवड करावी यासंबंधीचा तक्ता दिलेला आहे.

संभाव्यता नमूना निवड तंत्र संशोधनात वापरण्यासाठी उत्तरदात्यांची संपूर्ण तपशिलवार, अद्यावत, प्रमाणित यादी असणे अनिवार्य आहे. पण अनेक संशोधक ह्या अटीची पूर्तता न करताही संभाव्यता नमूना निवड तंत्राचा वापर नि:संकोच व बिनीदक्कत करतांना आढळतात. परीणामत: संशोधनाचा दर्जा खालावल्याशिवाय राहणार नाही ही वस्तुस्थिती आहे.

संशोधन क्षेत्रातील अनेक दिग्गज मंडळी संशोधन प्रश्न व गृहितके या दोहोंना एकाच अर्थाने घेताना आढळले. दूसरी बाब अशी की गृहितकृत्यांचे सुसूत्रीकरण (formulating hypothesis) व गृहितकृत्याची निर्मिती (Generate hypothesis) असे आहेत हया संबंधी अनेक संशोधकाला अज्ञान असल्याचे आढळले.

महाराष्ट्राच्या अधिकांश विद्यापीठात होणारे संशोधन हे संख्यात्मक संशोधन स्वरुपाचे असल्याने साहजिकच अशा संशोधनात गृहीतकृत्याचे सुसूत्रीकरण (Formulating Hypothesis) करणे अत्यावश्यक आहे आणि अशा गृहितकाची चाचणी नानाविध सांख्यिकीय चाचणीच्या माध्यमातून होणे अनिवार्य व अत्यावश्यक असते. त्यासाठी मीन, मेडिअन, मोड, स्टॅन्डर्ड डेव्हिएशन, कोरिलेशन, कायस्क्वेअर, वन वे अनोवा, टु वे अनोवा, टी–टेस्ट, एफ–टेस्ट व झेड टेस्ट इत्यादी सारख्या प्रगत सांख्यीकीय चाचणीची पडताळणी करुन घ्यावी पण अधिकांश संशोधकांना सांख्यिकीय ज्ञानाची प्रगत चाचणी व सैध्दांतिक वाङ्मय यासंबधी समाधानकारक माहिती नसल्याचे आढाळते. सांगायचे तात्पर्य सांख्यीकीय ज्ञान अत्यावश्यक असूनही आधीकांश संशोधक त्यापासून अज्ञानी व निरक्षर असल्याचे आढळतात.

गुणात्मक संशोधनपध्द्तीसंबंधी सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, आजमितीला राष्ट्रीय स्तरावर श्री.विनयकुमार श्रीवास्तव, डॉ. एस.के.चौधरी आणि अमिता बाविसकर यासारख्या भारतीय समाजशास्त्रज्ञांचे अनन्यसाधारण योगदान आहे. तर महाराष्ट्रापुरता विचार करता असे लक्षात येते की, गुणात्मक संशोधनाचा प्रसार व प्रचार करणाऱ्या, गुणात्मक संशोधनाचे आद्य संशोधक प्रा. डॉ. राजश्री महतानी यानी ३२ वर्षे टाटा संशोधन सामाजिक संस्था, मुंबई येथुन गुणात्मक संशोधनाची धुरा सांभाळली. पण डॉ. राजश्री महतानी यांच्या मते, मुळात महाराष्ट्रातील अतिशय अल्पशा संशाधकांचा कल गुणात्मक संशोधनाकडे आहे. दुसरी बाब अशी की, हया संशोधनामध्ये गृहितकृत्याचे जाळे विणले जाते म्हणजे गृहितककृत्ये येथे formulate न करता Generate करावी लागतात. तात्पर्य हेच की, महाराष्ट्रातील अधिकांश संशोधकांची संशोधन पद्धती ही संख्यात्मक अगर मिश्र स्वरुपाची असते. परीणामी अगदी शुध्द स्वरुपातील गुणात्मक संशोधन अतिशय दुर्मिळ असल्याचे आढळते.

दिवसेंदिवस संशोधन ही बाब सामाजिक बांधीलकी या स्वरुपाची न राहता ती वैयक्तिक लाभाकरिता करावयची बाब म्हणूनच अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. अधिकांश संशोधक हे संशोधनाच्या माध्यमातुन मिळणारी फेलोशिप, स्कॉलरशिप किंवा पगारवाढ इत्यादी सारख्या आर्थिक लाभांच्या दृष्टीकोनातुन संशोधनाकडे वळल्याचे मान्य करताना आढळतात. खुपच अल्प संशोधक हे जिज्ञासापोटी संशोधनाकडे वळाल्याचे दिसून आले आहेत.

संशोधनासंबंधीच्या मार्गदर्शक सुचना व तत्वांचा विचार करता असे आढळले की, विद्यापीठनिहाय व संशोधकमार्गदर्शकनिहाय वेगवेगळया निकषांचा, तत्वांचा व मुद्दयांचा थोडया फार फरकाने प्रत्यय येताना दिसतो आहे. बऱ्याचदा संशोधनासंबंधी परस्परविरोधी ज्ञान प्राप्त झाल्याचे आढळते. परिणामी संपुर्ण महाराष्ट्रात संशोधनासंबंधी सार्वत्रिक, सर्वव्यापी सर्वसमावेशक अशा समान ज्ञानाची दालने उघडली जावून त्यामाध्यमातून संशोधकांची वस्तुस्थितीपुरक, वस्तुनिष्ट व शास्त्रीय ज्ञानाची उजळणी व्हावी असा आग्रह आहे. परंतु

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

संशोधनासंबंधीच्या विरोधाभासी मतमतांतरामुळे अनेक संशोधकांमध्ये संभ्रमावास्था वाढीस लागून कोणाची व कोणती बाब योग्य मानावी? असा प्रश्न त्यांच्या मनात घर करतो आहे.

निष्कर्ष :

संदर्भीय संशोधन पेपरमधील उपलब्ध तथ्यानुसार लक्षात आले की, महाराष्ट्रातील सद्यकालीन समाजशास्त्रज्ञांसमोरील संशोधनद विषय अनेकविध आव्हाने आहेत. मख्यत्वेकरुन संशोधनाचे शिर्षक, काळानुरुप आव्हानांच्या स्वरुपातील होत गेलेले परिवर्तन, इंग्रजी संदर्भग्रंथाच्या वाचनाविषयीचा घटता कल, नमुना निवड तंत्राच्या निवडीविषयीचे अर्धवट व अपुरेज्ञान, गृहितकृत्यांबद्दल चुकीचा समज, गुणात्मक संशोधनाकडे महाराष्ट्रायीन संशोधकाचे होत जाणारे दुर्लक्ष, अघावत प्रगत तंत्रज्ञान व वैज्ञानिक पध्दती व तंत्राकडे होणारी डोळेझाक, तथ्यसंकलनाचे अनन्यसाधारण महत्व याकडे पहाण्याचा सहजभाव, सैध्दांतिक चौकटीसंबंधीची संभ्रमावस्था व संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर पदवी प्राप्त होण्यासाठी होत जाणारा विलंब या सारख्या आव्हानांना संशाधकाना सामोर जावे लागत आहे. परिणामत: सुरूवातीपासुन संशोधनातील दोषामुळे सबल व सक्षम तथ्य संकलन होत नाही. तथ्य विश्लेषणाच्या सांख्यिकीय चाचणीचे अद्यावत ज्ञान व माहिती ही अपुरी असल्याने शास्त्रशुध्द् निष्कर्ष काढण्यास अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते. अनेकदा संशोधकाला मार्गदर्शकाचे अचुक, पुरेसे व योग्य मार्गदर्शन न लाभल्याने त्याचा संशोधनातील उत्साह संपून त्यांची ज्ञानजिज्ञासा संपुष्टात येण्याची भिनी वाढु शकते. अनेकदा तर, संशोधन प्रबंध सादर केल्यानंतर पदवी प्राप्त होण्यासाठी तीन–तीन वर्षाची प्रतिक्षा करावी लागणे ही बाब संशोधकाच्या मानवी अधिकारांचे शोषण करणारी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती वाटु नये. हया सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून गुणवत्ता यादीतील पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील विद्यापीठाचा समावेश नाही.

संदर्भसुची :


१. अर्ल बेबी, 'रिसर्च मेथड्स इन सोशालॉजी,' सिनेज लर्निंग, ऑस्ट्रेलिया,२००९.

२. ॲलन, ब्रिमन, सोशन मेथड्स, ऑक्सफर्ड युनिव्हरसिटी प्रेस, न्युयार्क.

३. जे.आरे. गेट्टी, 'ट्रॉट्स्की इन एक्झाइल : दि फाऊडिंग ऑफ दि फोर्थ इटरनॅशल,' सोव्हिएट स्टडीज' खंड ३८ क्र." जानेवारी १९८६ पृ.३५–३६

४. आर.व्ही.क्रेजसी आणि डि.डब्ल्यु. मार्गत, 'डिटरमिनिंग सॅम्सल साईज फॉर रिसर्च–ॲक्टीव्हिटीज,' सेज पब्लिकेशन, न्य दिल्ली, १९७०.


PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad